I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** विजापुर नाका **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0041 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/01/2026 22:27 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 23/01/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 23/01/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 19:50 तास

2 **Day (दिवस):** शनिवार **Date from (दिनांक पासून):** 24/01/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 24/01/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:05 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 24/01/2026 **Time (वेळ):** 20:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 035 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 24/01/2026 22:27 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** महावितरण शाखा कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर , सोलापूर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**2.** **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** महावितरण शाखा कार्यालय,, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर, सोलापूर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6.** **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** पोलीस निरीक्षक श्री. शैलेश चंद्रकांत पवार

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1985 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

| | | |
|---|---|---|
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सदर बाज़ार, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9657917317

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक अमित विलासराव रेडेकर | | | 1. फ्लट नं-502,गलेक्सी अपार्टमेंन्ट,Town/Village (शहर / गाव): सेलीब्रेशन हटेलचे मागे,Tehsil (तहसील): विजापूर रोड,सोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): विजापुर नाका,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत<br>2. मुळ राठि- रेडेकर गल्ली,उसगांव,ता करवीर,Town/Village (शहर / गाव): जि कोल्हापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): करवीर,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3000/लाचेची मागणी | 3,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 3,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद तारीख 24/01/2026

मी. श्री. शैलेश चंद्रकांत पवार, वय - 41 वर्षे व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9657917317.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे सन जून / 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 23/01/2026 रोजी 10:30 वा. आम्ही ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. शुभम बाळु किरात वय 29 वर्षे, व्यव. सोलार सिस्टीम बसवणे, रा. 408 आंबेडकर नगर, तालुका पोलीस ठाणेचे मागील बाजूस, गुरुनानक चौक, सोलापूर हे ॲन्टी करप्शन सोलापूर कार्यालयात हजर झाले. त्यांनी त्याची लाच मागणीसंदर्भात तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांना सदरबाबत कळविल्याने त्यांनी आम्हास सदर तक्रारदार किरात यांचे तक्रारीवरून कारवाई करणेस सांगितलेने लागलीच आम्ही आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत दोन शासकिय पंच उपलब्ध करून देणेबाबत मा. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय सोलापूर यांना पत्र दिले.

त्यानंतर दि. 23/01/2026 रोजी 11.30 वा. चे सुमारास पंच (1) श्री. सुनिल सिध्देश्वर गणेचारी वय 32 वर्षे, पद सहा.कृषी अधिकारी नेम. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर रा. 2/16, गौरा नगर, दमाणी शाळेजवळ, सोलापूर व (2) श्री. सिध्दार्थ नंदकुमार शेंडगे वय 25 वर्षे, पद शिपाई नेम. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर रा. लक्ष्मी नरसिंव्ह बॉईज हॉस्टेल, अशोक विदयुत जवळ, वालचंद कॉलेज समोर, सोलापूर हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर युनिट येथील कार्यालयातील आमचे दालनात आमचे समक्ष उपस्थित झाले.

त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर अशी सांगुन त्यानंतर आमचे दालनात उपस्थित असलेले तक्रारदार श्री. शुभम बाळु किरात व वर नमुद दोन्ही पंच यांची आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर वर नमूद पंच साक्षीदार यांना आम्ही तक्रारदार श्री. शुभम बाळु किरात यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून पुढील कार्यवाही करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात

का? अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र. 1 म्हणून श्री. सुनिल सिध्देश्वर गणेचारी व पंच क्र. 2 म्हणून श्री. सिध्दार्थ नंदकुमार शेंडगे असे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. शुभम बाळु किरात वय 29 वर्षे, व्यव. सोलार सिस्टीम बसवणे, रा. 408 आंबेडकर नगर, तालुका पोलीस ठाणेचे मागील बाजूस, गुरुनानक चौक, सोलापूर असे असल्याचे सांगून, दि. 19/01/2026 रोजी नेट मिटरिंग डॉक्युमेंट तयार करुन शासनाचे आर.टी.एस पोर्टलवर ग्राहक श्री.थिटे यांचे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड केले. त्यानंतर श्री.थिटे यांचे घर महावितरण कार्यालय, डी.मार्ट शेजारी जुळे सोलापूर यांचे अखत्यारित येत असल्याने दि.20/01/2026 रोजी नमुद महावितरण कार्यालयातील शाखा अभियंता श्री.रेडेकर साहेब यांची भेट घेवून श्री. ओंकार बापुराव थिटे, रा. प्लॉट नं- 02, रेणुका गृहनिर्माण सोसायटी, जुळे सोलापूर ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांचे ऑनलाईन अर्जास मंजूरी देणेबाबत चर्चा करीत असताना शाखा अभियंता श्री.रेडेकर यांनी ऑनलाईन मंजूरी देणेसाठी एक किलोवॅट करीता 1000/- रुपये प्रमाणे 3 किलोवॅट करीता 3000/- रुपयांची लाच स्वरुपात मागणी करीत असलेबाबत थोडक्यात हकीकत सांगितली त्यानंतर त्यांना सदरची तक्रार त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली व त्यांचे तक्रारी अर्जासोबत नेट मिटरिंग डॉक्युमेंट तयार करुन शासनाचे आर.टी.एस पोर्टलवर ग्राहक श्री. थिटे यांचे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड केलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. नंतर सदरची तक्रार आम्ही व वर नमुद पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

लोकसेवक रेडेकर यांनी तक्रारदार श्री. किरात यांना दि. 23/01/2026 रोजी महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे बोलविले असल्याने तक्रारदार श्री. किरात यांचे तक्रारीनुसार लोकसेवक रेडेकर यांचेवर लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही तक्रारदार श्री. किरात व दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हाईस रेकॉर्डर व पॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगीतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. किरात यांचेकडे लोकसेवक रेडेकर हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र. 1 म्हणुन सुनिल सिध्देश्वर गणेचारी पंच क्र. 2 म्हणून श्री. सिध्दार्थ नंदकुमार शेंडगे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 गणेचारी पंच क्र. 02 शेंडगे यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री. किरात व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. गणेचारी पंच क्र. 02 श्री. शेंडगे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 12.32 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार श्री. किरात यांना लोकसेवक रेडेकर यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री. किरात यांचे शर्टाच्या आतील

बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. गणेचारी यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची सिलव्हर रंगाचे होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल क्र. एम. एच. 13 डी. एस. 7821 वरून डी मार्ट शेजारी जुळे सोलापूर येथील महावितरण कार्यालय येथे रवाना केले त्यावेळी व्हाईसरेकॉर्डर चालू केला ती वेळ 12.42 वा ची होती.

त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 शेंडगे असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.23 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. शेंडगे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, “¨ÉÒ व तक्रारदार किरात असे तक्रारदार यांचे मोटार सायकल वरुन सातरस्ता, गांधी नगर, आसरा चौक मार्गे महावितरण कार्यालय जुळे सोलापूर येथे गेलो. तेथे मोटारसायकल पार्किंगमध्ये लावून मी व तक्रारदार किरात असे महावितरण कार्यालयात गेलो असता आतमध्ये डावे बाजूस असलेले कक्षामध्ये गेलो, तेथे तक्रारदार किरात हे तेथे खुर्चीवर बसलेल्या रेडेकर यांचेशी येऊ सर... हयंच साहेब परवाच राहीलेल ओंकार थिटेच पाच दिवसांनी तुम्ही या म्हणलेल.. असे म्हणून नेट मिटरिंग डॉक्युमेंट तयार करुन शासनाचे आर.टी.एस पोर्टलवर ग्राहक श्री. थिटे यांचे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड केले असून, त्याचे ऑनलाईन मंजूरी देणेकरीताचे कामाचे अनुषंगाने चर्चा केली त्यादरम्यान आलोसे- थिटे.. तक्रारदार- हं.. ते आजून काय प्रोसेस झाल नाही, काय नाही.. अपलोड करूनबी आता पाच सहा दिवस झाले डॉक्युमेंन्ट.. आलोसे- मग त्याची चेकलीस्ट झाल्याशिवाय कस होणार.. चेकलीस्ट त्याची व्हायला पाहिजे ना.. अर्थिंग वगैरे चेक केल नाही.. इन्स्पेक्शन व्हायच असेल ना अजून .... तक्रारदार- त्यासाठीच व्हिजीटला आता तुम्ही.. आलोसे- व्हीजीट.. तक्रारदार- ही करतो म्हणलो की.. आलोसे- काय करतो.. झालय की बोलण आपल परवा.. हं.. साईट फक्त बघून येवू नंतर फॉरमॅट प्रिन्ट काढून आण.. तक्रारदार- हं.. .. . ते हयचबी बोलो सर मी कंपनीला.. आलोसे- हं.. तक्रारदार- पैशाच बी.. ते लास्ट टाईमचे तीन हजार राहीलेत म्हणल साहेबांचे दयायचे.. आलोसे- हं.. तक्रारदार- कंपनी म्हणतीय येवढ होत नाही.. साहेबांना बोला काय कमी जास्त कराय.. आलोसे- येवढ होत नाही म्हणजे.. आता रिलीज वगैरे काही विषय नाही ना.. तक्रारदार- पण माझ मत हाय थोडफार कमी करून घ्या.. ते दोन साईडच राहू दया.. हयच हजार रूपये कमी करून घ्या.. आलोसे- तस कस राहू दया.. राहू दया.. राहू दया.. प्रत्येक वेळी राहू दया होय.. आं.. तक्रारदार- हं.. आता हयच काय असल ते हजार रूपये घ्या.. हयच देतो .. ती मागच राहू दया सोडा जे असेल.. आलोसे- हं सोडू कुठ सोडू.. तक्रारदार- आपलं सर कधी करताय.. आलोसे- कधी म्हणजे तुझ्यावरच हाय ना सगळ.. माझ्यामुळ कुठ काय थांबलय तुझं.. तक्रारदार- मी ते.. करतो म्हणलो की तुमच.. आलोसे- तुझ्याकडन जस को ऑपरेशन येईल त्या पध्दतीत आमच काम असतय.. तक्रारदार- मी शंभर टक्के को ऑपरेट करायचा प्रयत्न करतो .. मग साहेब ते किती करू.. आलोसे- कस असतय.. आता एपीएन ची आजून दुसरीपण माणस येतील आता माझ्याकड तक्रारदार- हं.. आठ जण हायत. बरोबर हाय.. आलोसे- मग.. तुच अस का करतोस.. चेक लीस्ट घेवून ये प्रिन्ट काढून.. बघू मग.. काम तर बघू पहिल्यांदा काय केलस.. तक्रारदार- नाही नाही, काम केलय.. चेक लीस्ट घेवून येवू.. चार वाजता हाय का तुम्ही.. का आता येवू भरून थोडया वेळानी..आलोसे- नाही आता नको चार

वाजता घेवून ये.. असे म्हणून तक्रारदार किरात यांचेकडे लाचेची मागणी केली. त्यानंतर आम्ही त्यांना चेकलिस्टची प्रिंन्ट काढुन घेवून येतो असे सांगून तक्रारदार व मी किरात असे त्यांचेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आलो असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार किरात यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 गणेचारी यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण ऐकले असता सदरचे संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 गणेचारी व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक रेडेकर यांचेकडे दि. 23/01/2026 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना नेट मिटरिंग डॉक्युमेंट तयार करुन शासनाचे आर.टी.एस पोर्टलवर ग्राहक श्री. थिटे यांचे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड केले असून, त्याचे ऑनलाईन मंजूरी देणेकरीता लोकसेवक रेडेकर यांनी लाचेची मागणी केली. परंतु लाच मागणीची रक्कम सांगितली नाही व तक्रारदार यांना महावितरण कार्यालय, डी मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे 16.00वा चेकलिस्टची प्रिंन्ट घेवून बोलावले असलेचे स्पष्ट झाले. त्यानंतर पडताळणी कारवाईतील लाच मागणी रक्कम स्पष्ट नसल्याने व तक्रारदार यांना महावितरण कार्यालय, डी मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे 16.00वा चेकलिस्टची प्रिंन्ट घेवून बोलावले असल्याने सदरवेळी लाच मागणीची रक्कम स्पष्ट होण्याकरीता पुन्हा एकदा पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांनी तक्रारदार श्री. किरात यांना दि. 23/01/2026 रोजी महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे 16.00 वा बोलविले असल्याने तक्रारदार श्री. किरात यांचे तक्रारीनुसार लोकसेवक रेडेकर यांचेवर लाच मागणीची रक्कम स्पष्ट होणेच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता पंच क्र. 1 म्हणुन सुनिल सिध्देश्वर गणेचारी पंच क्र. 2 म्हणून श्री. सिध्दार्थ नंदकुमार शेंडगे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 गणेचारी पंच क्र. 02 शेंडगे यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री. किरात व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. गणेचारी पंच क्र. 02 श्री. शेंडगे यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 16.20 वा ची होती. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री. किरात यांचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. गणेचारी यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची सिलव्हर रंगाचे होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल क्र. एम. एच. 13 डी. एस. 7821 वरून डी मार्ट शेजारी जुळे सोलापूर येथील महावितरण कार्यालय येथे रवाना केले त्यावेळी व्हाईसरेकॉर्डर

चालू केला ती वेळ 16.34 वा ची होती.

त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 शेंडगे असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 18.05 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. शेंडगे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार किरात असे तक्रारदार यांचे मोटार सायकल वरुन सातरस्ता, गांधी नगर, आसरा चौक मार्गे महावितरण कार्यालय जुळे सोलापूर येथे गेलो. तेथे मोटारसायकल पार्किंगमध्ये लावून मी व तक्रारदार किरात असे महावितरण कार्यालयात गेलो असता आतमध्ये डावे बाजूस असलेले कक्षामध्ये गेलो, तेथे तक्रारदार किरात यांनी जावून लोकसेवक रेडेकर यांची भेट घेवून तक्रारदार- साहेब चेकलिस्ट आणलय. पण मला जेवढ येतय तस भरलय हा.. आलोसे- तुम्ही आडव कस काय प्रिंट आणलास.. तक्रारदार- ते तुम्ही एक्सल शीट दिलाव मग एक्सल शीट मध्ये असच आलय..आलोसे- करायच की मित्रा राजा.. काय रे बाबा असे म्हणून तक्रारदार- चालतय की हे बी काय तेच हाय आलोसे-हे नाही चालत हे.. अस नाही चालत. एका ह्याच्यावर बी सही येतय ना. हे ह्याच्याखाली बी याव लागतय. इथ सगळीकड नंबर लिहायला पाहीजे. इ व्ही मॉडेल सीरीयल नंबर सगळच घे याच्यावर. किती हायत टोटल तुझे पॅनल. जनरेशन मीटरच नंबर पाहिजे.. थोडा वेळ थांब. थांब थोडा वेळ. बाहेर थांब असे म्हणून तक्रारदार यांना कार्यालयाचे बाहेर बसण्यास सांगितले. त्यानंतर आलोसे यांनी काही वेळाने तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयात बोलावून त्याचेकडील चेकलिस्ट कॉपी देवून त्याचे झेरॉक्स आणणेबाबत सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी बाहेर जावून चेकलिस्टची झेरॉक्स काढून आणल्या नंतर तक्रारदार- हा घेतलय झेरॉक्स असे सांगितल्यावर आलोसे यांनी जाऊया असे सांगितले त्यावर तक्रारदार यांनी माझ्या सोबत एक जण हाय असे सांगितले असता आलोसे यांनी इथ थांबू दे ना तुझा कोण माणूस हाय ते असे म्हणून पंचास महावितरण कार्यालयास थांबवून, आलोसे व तक्रारदार असे तक्रारदार यांचे मो.सायकलवरुन ग्राहक श्री. थिटे यांचे प्लॉट नं- 02, रेणुका गृहनिर्माण सोसायटी, जुळे सोलापूर येथील रहाते घराकडे साईट व्हिजीट करता निघून गेले. त्यानंतर तक्रारदार यांना तिकडे गेल्यावर काय झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आलोसे रेडेकर व मी श्री. थिटे यांचे रहाते घराची साईट व्हीजीट केली त्या दरम्यान आलोसे यांनी हाताने इशारा करुन आणलयस का..दे पैसे असे म्हणून लाच रक्कमेबाबत विचारणा केली त्यावर मी पैसे.. तुम्ही.. देतो आणून लगेच. तुम्ही सांगा किती द्यायच. सांगा तर सांगा स्पष्ट असे म्हणालो त्यावर आलोसे यांनी देतो आणून म्हणजे? मगा तर गेलेलास की दुपारी तू त्यावर मी तुम्ही किती आणायच काय बोललावच नाही. तुम्ही तीन द्या म्हणलाव.. किती द्यायच तुम्ही सांगा स्पष्ट देतो. कमी जास्त करून घ्या. यावेळेस समजून घ्या. असे म्हणालो त्यानंतर ग्राहक श्री. थिटे यांची पत्नी श्रीमती. थिटे यांची चेकलिस्टवर सहया घेवून, मी व आलोसे हे तक्रारदार यांचे मो.सायकल वरुन महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर कार्यालयाकडे निघाले त्यावेळी मी आलोसे यांना लगेच देतो वीस मिनिटात. वीस मिनिटात देतो तुम्हाला. माझे पैसे इथून देणार आहे सरांना. त्यानी ऑनलाईन पाठवल तर कस बी तुम्हाला काढून देतो. काय बी करून देतो. किती देऊ सांगा की तुम्ही.. काय बोलीच नाय त्यावर आलोसे यांनी किती राहीलेत आपले मागचे.. तीन

झालेत ना? त्यावर तक्रारदार यांनी ह.. मागचे.. नाही मागचे. चार म्हणजे चार म्हणायलाव? त्यावर लोकसेवक हा.. त्यावर मी चार हजार साहेब? असे म्हणालो त्यावर आलोसे यांनी तुला कशाला वेगळ काय सांगु? आता हे तुझ कामाची सुरूवात आहे लक्षात ठेव. इथन पुढ अडचणी बऱ्याच असतेत.. असे म्हणून पुन्हा लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व आलोसे हे महावितरण कार्यालय येथे आल्यानंतर पंच श्री. गणेचारी यांचे समक्ष आलोसे यांनी मला फोन कर असे म्हणाले त्यावर मी आणि ह्याच एक साहेब.. साहेब.. किती देऊ? माग दोन साईट झाले आता हे एक तीन झाले साहेब. त्यावर आलोसे- अरे माग तीन झालेलेत. अस का करायला? त्यावर मी - तीन नाही दोनच केलाव तुम्ही. माग दोनचच होत आणि आत्ताच हे एक.. तीन. मी तेच विचार करायलतो आता. त्यावर आलोसे- घेऊन ये तीन...मी- आ?.. आलोसे- तीन घेऊन ये की. मी - तीन हजार..आलोसे- हां..त्यावर मी काय तर कमी करा की. त्यावर आलोसे- त्याच्यात काय कमी असतय बाबा. नाही होत...त्यावर मी तीन लई होतय ओ साहेब. काय तर मधला आकडा घ्या की.. त्यावर आलोसे- मधला बिदला काय नसतय बाबा. जे हाय ते तुला सांगितलय. त्यानंतर मी व पंच 1 असे माझेकडील मोटार सायकल वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आलो असे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 गणेचारी व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक रेडेकर यांचेकडे दि. 23/01/2026 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना नेट मिटरिंग डॉक्युमेंट तयार करून शासनाचे आर.टी.एस पोर्टलवर ग्राहक श्री. थिटे यांचे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड केले असून, त्याचे ऑनलाईन मंजूरी देणेकरीता लोकसेवक रेडेकर यांनी एक हजार रुपये तसेच यापुर्वी अशाच दोन प्रकरणांस ऑनलाईन मंजूरी दिली म्हणून त्याचे प्रत्येकी एक हजार प्रमाणे एकूण तीन हजार लाचेची मागणी केल्याचे व आजच लवकर सदरची लाच रक्कम घेवून महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे बोलावले असलेचे स्पष्ट झाले.

त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांचेविरूध्द सापळा कारवाई करणेचे अनुषंगाने आम्ही, पोनि/लांभाते पोहेकॉ/ 571 मुल्ला, पोह/1616 जाधव, पोह/158 पकाले, चापोह/984 गायकवाड यांना आमचे दालनात बोलावून त्यांची व तक्रारदार किरात व दोन्ही शासकीय पंच यांची आपसात ओळख करून दिली. व तक्रारदार किरात यांनी दिलेले तक्रारीवरून लोकसेवक रेडेकर, शाखा अभियंता, महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर यांची पडताळणी केली असता त्यांनी 3000/- रू लाचेची मागणी केलेचे व सदरची रक्कम महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे घेवून येणेस सांगितले असलेचे निष्पन्न झाल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार किरात तसेच सापळा पथकास सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार किरात यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लोकसेवक रेडेकर यांना देणेसाठी म्हणून 500/- रू दराच्या 6 चलनी नोटा एकूण रक्कम 3,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोह/जाधव यांनी नमुद नोटांचे नंबर कार्यालयातील संगणकावर टाईप करून घेवून त्याची प्रिन्ट काढली व त्यावर आम्ही पंचांनी सहया करून तो कागद

आमचेकडेच सुरक्षित ठेवला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समाजावून सांगून त्याबाबतचे प्रात्यक्षिक कार्यालयात कृत्रीम अंधार करुन दाखिवले. त्यानंतर सदरच्या चलनी नोटा पोह/158 पकाले यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोह/ पकाले यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर त्यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार किरात यांच्या नेसणीस असलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या व पोह/158 पकाले यांना कार्यालयात थांबून राहण्यास सांगितले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम" जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहेकॉ/ 571 मुल्ला हे त्यांचेकडील मोबाईलमध्ये करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर पडताळणी कारवाई मध्ये वापरलेलेच मेमरी कार्ड पुढील सापळा कारवाईसाठी वापरण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार किरात व दोन्ही पंचाचे निवेदने सदरचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रीत करून घेतले ती वेळ 18.41 वा ची होती.

त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार किरात यांना व्हॉईस रेकॉर्डर 18.51 वा. चालू करुन त्याचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 श्री. गणेचारी यांचेसह तक्रारदार यांचेकडील सिलव्हर रंगाचे होंडा कंपनीचे शाईन मोटार सायकल क्र. एम. एच. 13 डी. एस. 7821 या वरुन महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकीय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4108 या मधून रवाना झालो. महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र. 02 तसेच सापळा पथक वाहनातून उतरून कार्यालयाच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र. 01 हे महावितरण कार्यालय सोलापूर येथे गेले. परंतु आलोसे हे कार्यालयात उपस्थित नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 7020647812 वरुन आलोसे यांचे मोबाईल क्रमांक 9029108392 वर फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही करीता तक्रारदार यांनी त्यांचे कार्यालयातील उपस्थित असलेले पुरुष कर्मचारी यांचेकडुन आलोसे रेडेकर यांचा मोबाईल नंबर घेतला असता त्यांनी देखील 9029108392 मोबाईल क्रमांक दिला. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी 9029108392 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता फोन लागला नाही. करीता ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आले त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक देखील शासकीय वाहनाने परत आलो. त्यानंतर तक्रारदार किरात यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 गणेचारी यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले

असता ते पंच क्र. 01 गणेचारी व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुषंगाने आमचे सुचनेवरुन आलोसे रेडेकर कुठे आहेत याबाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार यांना 19.37 वा त्यांचे मोबाईल क्रमांक 7020647812 वरुन आलोसे यांचे मोबाईल क्रमांक 9029108392 फोन केला असता त्यांनी फोन उचला नाही. सदरचा कॉल व्हॉइस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांना आलोसे यांचा मिस्ड कॉल पडला असल्याचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेवरुन तक्रारदार यांनी 19.49 वा त्यांचे मोबाईल क्रमांक 7020647812 वरुन आलोसे यांचे मोबाईल क्रमांक 9029108392 फोन केला असता आलोसे रेडेकर यांनी उदया दि. 24/01/2026 रोजी फोन करुन महावितरण कार्यालय, डी मार्ट जवळ, सोलापूर येथे या असे सांगितले. सदरचा कॉल व्हॉइस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे. त्यानंतर आम्ही सापळा लाच रक्कम माझेकडे सुरक्षित ठेवून घेतली व तीच लाच रक्कम उदईक रोजी सापळा कारवाईत वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर सर्वानुमते आजची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांनी तक्रारदार श्री. किरात यांना आज दि. 24/01/2026 रोजी महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे फोन करुन बोलविले असल्याने तक्रारदार श्री. किरात यांचे तक्रारीनुसार लोकसेवक रेडेकर यांचेवर लाच सापळा कारवाई करण्याकरिता पंच क्र. 1 म्हणुन सुनिल सिध्देश्वर गणेचारी पंच क्र. 2 म्हणून श्री. सिध्दार्थ नंदकुमार शेंडगे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 गणेचारी पंच क्र. 02 शेंडगे यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची खात्री करून दिली. त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांनी आज दि. 24/01/2026 रोजी महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर येथे फोन करुन येण्यास सांगितल्याने तक्रारदार यांनी 11.29 वा त्यांचे मोबाईल क्रमांक 7020647812 वरुन आलोसे रेडेकर यांचे मोबाईल क्रमांक 9029108392 वर फोन केला असता आलोसे रेडेकर हे महावितरण कार्यालयामध्ये असून महावितरण कार्यालयामध्ये येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. सदरचा कॉल व्हॉइस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे.

त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांचेविरूध्द सापळा कारवाई करणेचे अनुषंगाने आम्ही, पोनि/लांभाते पोहेकॉ/ 571 मुल्ला, पोह/1616 जाधव, पोह/158 पकाले, चापोह/984 यांना आमचे दालनात बोलावून त्यांची व तक्रारदार किरात व दोन्ही शासकीय पंच यांची पुन्हा आपसात ओळख करून दिली. दि. 23/01/2026 रोजी तक्रारदार किरात यांनी दिलेले तक्रारीवरून लोकसेवक रेडेकर, शाखा अभियंता, महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर यांची पडताळणी केली असता त्यांनी 3000/- रू लाचेची मागणी केली परंतु सापळा कारवाई दरम्यान आलोसे रेडेकर हे कार्यालयात उपस्थित नसल्याने व त्यानंतर आलोसे यांनी आज दि. 24/01/2026 रोजी सदरची लाच रक्कम महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे घेवून येणेस सांगितले असल्याचे निष्पन्न झाल्याने. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार किरात तसेच सापळा पथकास सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही काल दि. 23/01/2026 रोजीची सुरक्षित ठेवलेली सापळा लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष हजर केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना ऍन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म पुन्हा एकदा समजावून सांगून त्याबाबतचे प्रात्यक्षिक

कार्यालयात कृत्रीम अंधार करुन दाखिवले. त्यानंतर सदरच्या चलनी नोटांना पुन्हा पोह/158 पकाले यांना ऍन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोह/ पकाले यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ऍन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर त्यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार किरात यांच्या नेसणीस असलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच पोह पकाले यांना कार्यालयातच थांबून राहण्यास सांगितले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहेकॉ/ 571 मुल्ला हे त्यांचेकडील मोबाईलमध्ये करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर पडताळणी कारवाई मध्ये वापरलेले मेमरी कार्ड पुढील सापळा कारवाईसाठी वापरण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये यापूर्वी पडताळणी कारवाईतील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असलेची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार किरात व दोन्ही पंचाचे निवेदने सदरचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रीत करून घेतले ती वेळ 11.33 वा ची होती.

त्यानंतर लोकसेवक रेडेकर यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार किरात यांना व्हॉईस रेकॉर्डर 11.43 वा. चालू करुन त्याचे शर्टाच्या आतील बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 श्री. गणेचारी यांचेसह तक्रारदार यांचेकडील सिलव्हर रंगाचे होंडा कंपनीचे शाईन मोटार सायकल क्र. क्र. एम. एच. 13 डी. एस. 7821 या वरुन महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4108 या मधून रवाना झालो. महावितरण कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र. 02 तसेच सापळा पथक वाहनातून उतरून कार्यालयाच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र. 01 हे महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर येथील कार्यालयातील आतमध्ये डावे बाजूस असलेले कक्षामध्ये गेले. त्यानंतर काही कालावधीत तक्रारदार महावितरण कार्यालयाचे बाहेर येवून त्यांचे डाव्या हाताने चष्मा काढून लाच रक्कम स्विकालेचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा पथक असे महावितरण कार्यालयातील आतील डावे बाजूस असलेल्या कक्षात जावून आम्ही लोकसेवक रेडेकर यांचा उजवा हात व पोनि/लांभाते यांनी लोकसेवक रेडेकर यांचा डावा हात पकडला. त्यानंतर आम्ही लोकसेवक रेडेकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली. त्याचवेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईसरेकॉर्डर काढून बंद केला ती वेळी 12.04 वा. ची होती.

त्यानंतर पोह/मुल्ला यांनी त्यांचे मोबाईलवरून सदर घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डीग सुरू केले. त्यानंतर आम्ही लोकसेवक रेडेकर यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नांव अमित विलासराव रेडेकर वय-42 वर्षे सद्या रा. फ्लॅट नं-502, गॅलेक्सी अपार्टमेंन्ट, सेलीब्रेशन हॉटेलचे मागे, विजापूर रोड, सोलापूर व मुळ. रा.ठि- रेडेकर गल्ली, उचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर असे असल्याचे सांगून ते महावितरण शाखा कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे सहाय्यक अभियंता या पदावर

कर्तव्यास असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही आरोपी लोकसवेक रेडेकर यांना लाच रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी पँटच्या मागच्या उजव्या बाजूच्या खिशातून लाचेची रक्कम काढून आमचेकडे दिली ती लाच रक्कम पंच क्र. 2 श्री. शेंडगे यांचेकडे दिल्या त्यानंतर आलोसे रेडेकर यांचे कक्षातील लाईट बंध करुन कृत्रिम अंधार करुन अंधारात आलोसे रेडेकर यांनी स्विकार केलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर आलोसे यांची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताला तसेच लोकसेवक रेडेकर यांचे नेसते पॅन्टचे पाठीमागील उजवे खिशाचे आतील बाजूस ऍन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट हिरवट रंगांची चकाकी दिसून आली. त्यानंतर लोकसेवकाकडील मिळून आलेल्या नोटांचे क्रमांकाची पंच नं. 2 यांचे करवी तपासणी केली असता त्या तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळून आल्या. त्यानंतर आरोपी लोकसेवक रेडेकर यांना शासकिय वाहनातून लाप्रवि कार्यालय सोलापूर येथे आणण्यात आले.

त्यानंतर पंच क्र. 01 श्री. गणेचारी यांना सापळा कारवाईदरम्यान लाचेची रक्कम आलोसे रेडेकर यांना देण्यासाठी गेल्यानंतर काय घडले हे आमच्या समक्ष पंच क्र. 02 यांना सांगा असे म्हणालो असता पंच क्र. 1. श्री. गणेचारी यांनी सांगीतले की,

“मी व तक्रारदार श्री. किरात असे त्यांचे दुचाकी वरून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातून निघून सातरस्ता, गांधी नगर, आसरा चौक मार्गे महावितरण कार्यालय, जुळे सोलापूर येथे लोकसेवक रेडेकर बसतात त्या कक्षात गेलो व आमचे मागे आपण, पंच नं. 2 व सापळा पथक असे महावितरण कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथे येवून सापळा लावून थांबलात. तेथे तक्रारदार यांनी आलोसे रेडेकर याचे कक्षात जावून तकारदार- येवू साहेब.. त्यावर आलोसे- काय तु रात्रीच फोन करायलास.. सकाळी.. तक्रारदार- हं..हं.. ते अप्रोव्ह करा की.. तेवढ.. आलोसे- अजुन चेकलीस्ट जमा कर की.. डाक्युमेन्ट आणि चेकलीस्ट म्हणून हाताने इशारा करुन पैसेची मागणी केली त्यावर तक्रादार- हे.. तीन हजार आहेत.. मोजून घ्या.. आपल सगळ क्लिअर झाल बघा त्यावर आलोसे- हं.. ठीक हाय.. .. चेक लीस्ट आणि ओरिजनल डाक्युमेंन्ट कुलकर्णी सायबांच्याकडे दे.. आता हायत का बघ कुलकर्णी साहेब .. गुरुनानक ला.. आणि मला फक्त मॅसेज टाकून ठेव.. त्यावर आलोसे- हं असे सांगून दरम्यानच्या कालावधीत तक्रारदार महावितरण कार्यालयाचे बाहेर येवून त्यांचे डाव्या हाताने चष्मा काढून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आपण व सापळा पथकाने रेडेकर यांना पकडले. त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी सुध्दा वरील प्रमाणे हकिकत सांगीतले सदर बाबत सविस्तर पंचनामा ऍन्टी करप्शन ब्युरो कार्याल्य सोलापूर येथे करण्यात आला.

तरी तक्रारदार श्री. शुभम बाळु किरात यांना सुरवातीस 1 किलो वॅटला 1 हजार रुपये प्रमाणे एकूण 3 किलो वॅटकरीता 3 हजार रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत दि.23/01/2026 रोजी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन दि. 23.01.2026 रोजी 11:30 वा. पासून 19:50 वा. चे दरम्यान पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी नेट मिटरिंग डॉक्युमेंट तयार करुन शासनाचे आर.टी.एस पोर्टलवर ग्राहक श्री. थिटे यांचे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड केले असून, त्याचे ऑनलाईन मंजूरी देणेकरीता आरोपी लोकसेवक अमित विलासराव रेडेकर वय- 42 वर्षे पद- सहाय्यक

अभियंता, नेम- महावितरण शाखा कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर यांनी ऑनलाईन मंजूरीसाठी 1000/- व यापुर्वी ऑनलाईन मंजूरी दिलेली 02 प्रकरणाची प्रत्येकी 1000/- प्रमाणे 2000/- अशी एकूण 3000/-लाचेची मागणी करून ती रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक 24.01.2026 रोजी 11:00 वा ते 12:05 वा. चे दरम्यान महावितरण शाखा कार्यालय, डि मार्ट जवळ, जुळे सोलापूर येथील ते बसत असलेले कक्षामध्ये स्वत: स्विकारून बेकायदेशीर व अप्रमाणिकपणे स्वत:चा आर्थिक फायदा मिळवला म्हणून माझी आरोपी लोकसेवक अमित विलासराव रेडेकर वय- 42 वर्षे सद्या रा. फ्लॅट नं-502, गॅलेक्सी अपार्टमेंन्ट, सेलीब्रेशन हॉटेलचे मागे, विजापूर रोड, सोलापूर व मुळ. रा.ठि- रेडेकर गल्ली, उचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Dada Somnath Gaikawad (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Dada Somnath Gaikawad

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DGPSGM7405

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍या/पाहिलेल्‍या) शारीरिक वैशिष्‍टये, व्‍यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1984 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍यंग वैशिष्‍टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍याच्‍या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍यापेक्षा अधिक तपशील दिल्‍यास फक्‍त यातील रकान्‍यांची नोंद घेतली जाईल)**